भाजपा नेते माजी खासदार निलेश राणे यांचे रत्नागिरी जिल्ह्यात जंगी स्वागत

राजापूर तालुका ढोलताशांच्या गजराने दणाणला

◆ राजापूर (प्रतिनिधी):

गुरुवारी रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आलेल्या भाजपा नेते माजी खासदार निलेश राणे यांचे राजापुरात जंगी स्वागत करण्यात आले. सिंधुदुर्गकडून रत्नागिरीकडे आगमन होताना राजापुरात महामार्गावर हातिवले येथील टोल नाक्यावर व त्यानंतर पुढे राजापूर शहरात जकात नाक्यावर निलेश राणे यांचे राजापुर तालुका भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले. 'निलेश राणे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' चा नारा देत राजापुरात राणे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

प्रारंभी हातिवले येथील टोल नाक्यावर राणे यांचे आगमन झाले. या ठिकाणी ढोलताशांच्या गजरात भाजपाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर गाड्यांच्या ताफ्यासह राजापूरकडे रवाना झालेल्या निलेश राणे यांचे शहरातील प्रवेशद्वारावर जकात नाक्यावर जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी तालुक्याच्यावतीने राजापूर दक्षिण मंडळचे तालुकाध्यक्ष सुरेश गुरव, पूर्व मंडळ तालुका अध्यक्ष भास्कर सुतार यांसह पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार घालून निलेश राणे यांचे स्वागत केले. तर अनेकांनी पुष्पगुच्छ देऊन राणे यांचे स्वागत केले.

याप्रसंगी भाजपा जिल्हा सरचिटणीस रवींद्र नागरेकर, विधानसभा निवडणुक प्रमुख उल्का विश्वासराव, जिल्हा उपाध्यक्ष अभिजित गुरव, ओबीसी सेलचे प्रदेश सचिव अनिलकुमार करंगुटकर, राजापूर दक्षिण मंडळचे तालुकाध्यक्ष सुरेश गुरव, पूर्व मंडळ तालुका अध्यक्ष भास्कर सुतार, चंद्रकांत लिंगायत, दीपक बेंद्रे, युवा मोर्चा अध्यक्ष अरविंद लांजेकर, अमजद बोरकर, समीर खानविलकर, वसंत पाटील, बाळ दाते, आशिष मालवणकर, संदेश आंबेकर, राजा खानविलकर, प्रसाद पळसुळेदेसाई, महिला मोर्चा अध्यक्षा सुयोगा जठार, शितल पटेल, शितल गोठणकर, रसिका कुशे, रेणुका गुंडये, सोनल केळकर, शीतल रहाटे, शहर अध्यक्ष विवेक गुरव, आदींसह सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

लांजा शहरात 'निलेश राणे आगे बढो'च्या घोषणा

◆ लांजा (प्रतिनिधी) :

कार्यकर्त्यांमुळे पक्ष मोठा होतो आणि म्हणूनच कार्यकर्त्यांना न्याय मिळावा ही आपली नेहमीच भूमिका असते. कार्यकर्त्याला बळ दिले पाहिजे व त्यासाठी निलेश राणे नेहमीच संघर्ष करत राहील अशा शब्दांत माजी खासदार व भाजपा प्रदेश सचिव निलेश राणे यांनी लांजा येथील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांना बळ दिले.

गुरुवार २ नोव्हेंबर रोजी लांजा येथे आलेल्या भाजपा प्रदेश सचिव आणि माजी खासदार निलेश राणे यांचे पदाधिकाऱ्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आले. शहरातील शेट्ये पटांगण येथे फटाक्यांच्या आतषबाजीत आणि 'निलेश राणे आगे बढो' च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडण्यात आला.

निलेश राणे यांनी काही दिवसांपूर्वी निवृत्तीचा निर्णय जाहीर केला होता. मात्र भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी केलेल्या यशस्वी चर्चेनंतर त्यांनी आपला निर्णय मागे घेतला होता. त्यानंतर प्रथमच लांजा दौऱ्यावर आलेल्या निलेश राणे यांचे गुरुवारी लांजा येथे जोरदार स्वागत करण्यात आले. सुरुवातीला सर्व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून निलेश राणे यांचे पुष्पगुच्छ देऊन जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना निलेश राणे म्हणाले की,'संपूर्ण कोकणात आपल्याला भाजप पक्ष आणि संघटना अधिक मजबूत करायची आहे. मी लांजा येथे आलो की आपल्याला या ठिकाणी मिळणारे प्रेम हे नेहमीच वेगळे असते. म्हणूनच आपण या ठिकाणी येथील कार्यकर्ते एक कुटुंब मानतो आणि आपण कोणताही निर्णय घेतला तरीही आपले हे कुटुंब आपल्या नेहमीच पाठीशी असते. त्यामुळे मी नेहमीच तुमच्या ऋणात राहीन. पक्ष संघटना वाढीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागा. या रत्नागिरी जिल्ह्याने आपल्याला खरी ओळख मिळवून दिली. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत व कार्यकर्त्यांनी सज्ज राहिले पाहिजे. प्रेम समोरासमोर न दाखवता प्रत्येक कार्यकर्त्याने हे प्रेम आपल्या कामातून व प्रभागात बुथ बांधून दाखवून दिले पाहिजे'.

चिपळूणच्या वैभवात पडणार भर

छ. शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा लवकरच उभारणार

◆ चिपळूण (प्रतिनिधी) :

कोकणची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असणाऱ्या चिपळूण शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा लवकरच उभा राहाणार आहे. या पुतळ्यामुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे. गेले कित्येक महिन्यापासून रखडलेले या पुतळ्याचे काम पावसाळा संपताच पुन्हा जोमाने सुरू झाले असून काही भागाचे प्लास्टर व ससोलिंग, पिचिंगचे काम युद्ध पातळीवर हाती घेण्यात आले आहे. येत्या १५ दिवसात नक्षीदार दगड बसविण्यासह शिवसृष्टीच्या कामालाही सुरूवात केली जाणार आहे.

राज्याचे उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी या कामात विशेष लक्ष घातल्याने या कामांना गती प्राप्त झाली आहे. चिपळुणात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी सातत्याने पुढे येत होती. या मागणीची दखल घेऊन चिपळूण नगर पालिकेमार्फत शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारणीच्या हालचाली सुरू झाल्या. तत्कालीन पालकमंत्री रवींद्र वायकर यांनी हा पुतळा उभारण्याचे जाहीर केले. त्यानुसार कोट्यवधी रूपये खर्च करून शहरात पुतळा उभारणीचे काम सुरू झाले. मध्यंतरीच्या काळात या पुतळ्याचे काम थांबले होते. यासंदर्भात येथील काही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी नगर पालिकेवर धडक देत या पुतळ्याचे काम तातडीने मार्गी लावावे, अशी मागणी केली होती. विद्यमान पालकमंत्री ना. उदय सामंत यांनीही या पुतळ्याच्या कामाकडे विशेष लक्ष घातले आहे. चिपळूण दौऱ्यादरम्यान त्यांनी या पुतळा परिसरात शिवसृष्टी उभारण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यासाठी व सुशोभीकरणासाठी एक कोटीचा निधीही मंजूर केला. शिवसृष्टीचे काम मुंबईतील जे.जे. स्कूल ऑफ आर्ट करणार आहे. त्यानुसार मे महिन्यात प्राध्यापक शशिकांत काकडे आणि विजय सकपाळ यांनी साईटवर पाहणी केली आणि आराखडा सादर करणेबाबत चर्चा केली होती.

सध्या याठिकाणी पुतळा उभारणीचे आणि सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. या कामापैकी भिंतीचे काम पूर्णत्वास गेले आहे तर काही भागात प्लास्टर, सोलिंग व पिचिंग केले जात आहे. हे काम लवकरच पूर्ण होणार आहे. त्यानंतर नक्षीदार कामांना सुरुवात होणार आहे. त्यात दगड बसवण्यासह शिवसृष्टीच्या कामाचा समावेश आहे. नागरिकांच्या शंकेचे निरसन पुतळ्याच्या सभोवतालीचे काम सुरू झाल्यानंतर बगीचा कोठे करणार असा प्रश्न काही नागरिकांना पडला.

वेचक

मूकबधिर विद्यार्थ्यांचा बोलका कलाविष्कार

रत्नागिरी : मांगल्याची दिवाळी काही दिवसांवर आली आहे. या दिवाळीकरिता लहान मोठे आकर्षक आकाशकंदील, शुभेच्छापत्रे, रंगीत पणत्या, वारली पेंटिंग फ्रेम्स, लाकडी शो पीस, बैलगाडी, शोभेच्या वस्तू, किल्ल्यावर ठेवण्यासाठी मातीचे मावळे, लाकडी खेळणी अशा अनेकविध वस्तू येथील (कै.) के. प. अभ्यंकर मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी साकारल्या आहेत. सध्या शाळेत या वस्तू बनवण्यासाठी लगबग पाहायला मिळाली. या सर्व वस्तूंचे ३८ वे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. मूकबधरि विद्यार्थी दीपावलीच्या तयारीत मग्न आहेत. अतिशय सुरेख शुभेच्छापत्रे बनवली आहेत. या शुभेच्छापत्रांना समाजातील अनेक मान्यवरांसह कंपन्यांनी मागणी नोंदवली आहे. लाकडी शोपीस, आकर्षक पेनस्टॅण्ड, बैलगाडी आकर्षक आहे. पणत्या, लाकडी पणती स्टण्डही आहे. पिशव्या, दुपटी, पर्सही दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांनी बनवल्या आहेत. याशिवाय मसाले, चटण्या, भाजणी याही गोष्टी बनवण्याचे काम सुरू आहे. आखीव, रेखीव आणि सुबक वस्तू लोकांच्या पसंतीस उतरतील. लहान- मोठे आकाशकंदिल बनवण्यात येत आहेत. या कंदिलांना चांगली मागणी दरवर्षी असते. यंदा वारली पेंटिंगच्या आकर्षक फ्रेम सर्वांनाच आवडतील. चावीसाठी लाकडी व मण्यांच्या किचेन्स बनवण्यात येत आहेत. व्यावसायिक पातळीवरही या वस्तू टिकाव धरू शकतील, अशा या सर्व वस्तू मनमोहक आहेत. कलात्मकतेने मातीपासून बनवलेले छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांचे छोटे पुतळे, सुगंधी उटणे यासाठी विद्यार्थी भरपूर मेहनत घेत आहेत. सध्या शाळेत पहिली ते आठवीमध्ये ३२ विद्यार्थी आहेत. ४ विद्यार्थिनी दहावीचा अभ्यास करत आहेत. सर्व शिक्षक, कलाशिक्षक या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असून विद्यार्थी या कलात्मक वस्तू बनवण्यात दंग झाले आहेत. दरवर्षी हस्तकला प्रदर्शनाच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना समाजाशी संवाद साधता येतो. वस्तू विक्रीतून व्यवहारज्ञान कळते. यामुळे हे प्रदर्शन विद्यार्थ्यांना खूप काही देऊन जाते.

'पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना प्रवासी सवलतीचा लाभ देण्यात यावा'

राजापूर (वार्ताहर) : कार्तिकी एकादशीसाठी कोकणातून पंढरपूर यात्रेला जाणाऱ्या वारकऱ्यांना ज्येष्ठ नागरिक व महिला यांच्यासाठी असलेली सवलत देण्यात यावी. तसेच पुरेसा सीट कोटा उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजित यशवंतराव यांनी केली आहे. याबाबतचे लेखी निवेदन अजित यशवंतराव यांनी राजापूर एस.टी. आगार प्रशासनाला दिले आहे. यावर्षी १८ ते २३ नोव्हेंबर दरम्यान कार्तिकी एकादशी यात्रा भरत आहे.

नासा, इस्रोत जाणार जिल्ह्यातील ५५ विद्यार्थी

◆ रत्नागिरी :

जिल्हा परिषदेमार्पत यावर्षी देखील जि.प.पाथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ संशोधनाबाबत जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी नासा (अमेरिका) व इस्रो (भारत) येथे सफर घडविण्यात येणार आहे. त्यासाठी यावेळेस जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेत एकूण ५५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

नासा व इस्त्रो या अभ्यास दौऱ्यासाठी जिल्हा परिषद शाळास्तरावर २५१ केंद्रांवर २० हजार ५११ विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा नुकतीच घेण्यात आली होती. त्यातून एकूण ५५ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली असून त्यातील २० मुले नासासाठी निवडली गेली आहेत. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकुमार पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली गतवर्षीपमाणे यावर्षी देखील नासा व इस्त्रो या विज्ञान संशोधन संस्थांना विद्यार्थ्यांना भेटी घडविण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी यापूर्वीच सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिलेले आहे. नासा व इस्त्रो भेटीसाठी जि.प.प्रशासनस्तरावर केंद्रस्तरावर विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यात आली. त्यातून नासा-इस्त्रो संस्थांना भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली आहे.

नासा भेटीसाठी अंतिम निवड झालेले विद्यार्थी तालुकानिहाय

मंडणगड-ओम शैलेश कोबनाक (केंद्र शाळा देव्हारे), आक्षा संदिप आग्रे (केंद्रशाळा चिंचघर), दापोली- मानिनी मंगेश आग्रे (जि.प.शाळा मळे), शुभम जयंत जोशी (जि.प.शाळा कोळथरे), खेड- सार्थक प्रकाश महाडिक (जि.प.शाळा धामणदेवी बेलवडी), किर्ती केशव मुंढे (जि.प.शाळा असगणी नं.२), चिपळूण- दक्ष दिनेश गिजये (जि.प.शाळा पाग मुलांची), इच्छा सिताराम कदम (जि.प.शाळा अनारी), गुहागर- विराज विष्णू नाचरे (जि.प.शाळा पाभरे), पूर्वा उमेश जाधव (जि.प.शाळा पिंपर नं.१), संगमेश्वर- प्रसाद सतीश धामसेकर (केंद्रशाळा डिंगणी, गुरववाडी), स्वराज दिलीप पाक्तेकर (जि.प.शाळा डिंगणी, खाडेवाडी), सिध्दी भिमराव पाटील (छ.शिवाजी आदर्श विद्यामंदिर देवरुख नं.४), रत्नागिरी- ऋषभ गौतम गायसमुद्रे (कुवारबाव महालक्ष्मीनगर शाळा क.२), श्रेया संदीप आग्रे (जि.प.शाळा कोळीसरे नं.१), लांजा- प्रणव लक्ष्मण कोलगे (प्राथमिक शाळा जावडे क्र.१), सुमेध सचिन जाधव (आदर्श शाळा शिरवली).

खेडच्या ग्रामीण भागातही डेंग्यूची साथ आटोक्यात

खेड (प्रतिनिधी) : खेड शहरासह ग्रामीण भागातही फैलावलेली डेंग्यूची साथ आटोक्यात आणण्याच्या तालुका आरोग्य विभागाच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. साथ आटोक्यात आली असली तरी सर्वेक्षणाची मोहीम सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच डास प्रतिबंधक फवारणीही सुरू आहे.

शहरात फैलावलेल्या डेंग्यू साथीने तालुका आरोग्य विभाग व नगर प्रशासनासह नागरिकांची चिंता वाढली होती. मात्र आरोग्य यंत्रणांच्या शर्थीच्या प्रयत्नाने शहरासह ग्रामीण भागातही फैलावलेली डेंग्यूची साथ आटोक्यात आली आहे. साथ नियंत्रणात आली असली तरी त्या-त्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत.

चिपळूणमध्ये दिवाळीनंतर विकासकामांचे भूमिपूजन

◆ चिपळूण (प्रतिनिधी) :

चिपळुणात भारतीय जनता पार्टीच्या वतीने माजी आमदार प्रमोद जठार यांच्या हस्ते दिवाळीनंतर विकासकामांची भूमिपूजन करण्यात येणार आहे. भाजपाच्यावतीने महाविजय २०२४ चा संकल्प करण्यात आला असल्याचे भाजपा तालुकाध्यक्ष वसंत ताम्हणकर यांनी सांगितले.

चिपळुणात भाजपा जोर धरू लागली आहे. याचाच एक भाग म्हणून रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख, माजी आमदार प्रमोद जठार यांच्या हस्ते दिवाळीनंतर विकासकामांच्या भूमिपूजनांचा नारळ फोडून महाविजय २०२४ चा संकल्प करण्यात येणार आहे. गेल्या पाच-सहा वर्षांत पक्षाच्या माध्यमातून चिपळूणात कोट्यवधी रुपयांचा निधी आला.

परंतु भारतीय जनता पार्टी म्हणून विकासकामांचा एकही नारळ फुटला नाही. 'फिरसे एक बार मोदी सरकार, महाविजय' नारा देत भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून विकासकामांचा धडाका लावला जाणार आहे.

समर्थ कृपा विद्यालयात होमी भाभा जयंती साजरी

खेड (प्रतिनिधी) : वेरळ येथील श्री समर्थ कृपा विश्व प्रतिष्ठान संचलित श्री समर्थ कृपा इंग्लिश मिडीयम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात वैज्ञानिक होमी भाभा यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. एस. अली यांच्या हस्ते होमी भाभा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ६ वीतील समर्थ झांजे व अस्मी जंगम या विद्यार्थ्यांनी भाभा यांच्या जीवनाविषयी माहिती दिली.

मध्य रेल्वे
निविदा सूचना
निविदा क्र.
डीआरएचकेव्हायएनव्हीईजीएफआरयूआय टीएस२०२३,
दिनांक : २८.१०.२०२३
एक वर्ष कालावधीसाठी विभागिय रेल्वे रुग्णालय, कल्याण येथे भाज्या आणि फळांच्या पुरवठ्यासाठी काम. **कामाचे नाव आणि ठिकाण :** एक वर्ष कालावधीसाठी विभागिय रेल्वे रुग्णालय, कल्याण येथे भाज्या आणि फळांच्या पुरवठ्यासाठी काम. **ठिकाण:** विभागिय रेल्वे रुग्णालय, वालधुनी, कल्याण (पूर्व), ४२१३०३१; **कामाचा/कंत्राट कालावधी:** १२ महिने; **बोलीकरण समाप्ती दिनांक:** १५.११.२०२३, दुपारी ३.०० वा. **बोलीकरण सुरु दिनांक :** ०१.११.२०२३; **पात्रता निकष, अटी आणि शर्ती आणि निविदेशी अन्य संबंधित तपशील मध्य रेल्वे संकेतस्थळावर उपलब्ध आहे: http:// www.ireps.gov.in** 632
तिकिटांसाठी युटीएस ॲप डाऊनलोड करा

नाशिक महानगरपालिका नाशिक
मलनिःसारण यांत्रिकी विभाग
ई निविदा सुचना क्र. १८/२०२३-२४
नाशिक महानगरपालिका मलनि:सारण यांत्रिकी विभागाकडून ई निविदा मागविणेत येत आहे. ई निविदा सुचना क्र. १८/२०२३-२४ चे सविस्तर तपशील दिनांक ०३/११/२०२३ पासून महाराष्ट्र शासनाचे वेबसाईट **www.mahatenders.gov.in** यावर उपलब्ध आहे.
जनसंपर्क/जा.क्र/३१९/दि.२/११/२०२३
सही/-
अधिक्षक अभियंता (यां)
नाशिक महानगरपालिका नाशिक
झाडे लावा, झाडे जगवा

नाशिक महानगरपालिका,नाशिक
सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,
पाणी पुरवठा
ई-निविदा सुचना क्र. ०६ शुध्दीपत्रक (सन २०२३ - २४)
नाशिक महानगरपालिका, नाशिक सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा विभागाच्या गंगापूर धरण रॉ वॉटर पंपींग स्टेशन ते बारा बंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यत कच्चे पाणी (रॉ वॉटर) वाहून नेणेसाठी लोखंडी पाईप १८०० मी मी व्यासाची मुख्य गुरुत्ववाहिनी टाकणे व अनुषंगिक कामे करणे. या कामांची जाहिर ई-निविदा सुचना क्र.०६ (सन २०२३-२४) दिनांक ०६/११/२०२३ पासुन दिनांक २०/१२/२०२३ रोजी ४.०० वाजेपावेता मा.शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीचा अंतीम दि.२०/१२/२०२३ राहील.
टीप- यापुढील सर्व आवश्यक सुचना/शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.
सही/- अधीक्षक अभियंता (पापुवि/मलनिः) नाशिक महानगरपालिका, नाशिक
सही/- आयुक्त नाशिक महानगरपालिका, नाशिक
जनसंपर्क/जा.क्र/३१७ दि.२/११/२०२३
सर्व नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे.

डॉ. ज्योती यादव यांना राष्ट्रीय आदर्श वैद्यकीय सेवा पुरस्कार

◆ चिपळूण (प्रतिनिधी) :

बेळगाव येथील इंटिग्रेटेड सोशल वेल्फेयर सोसायटी व नॅशनल रूरल डेव्हलपमेंट

फाऊंडेशनच्या वतीने तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती यादव यांना राष्ट्रीय आदर्श वैद्यकीय सेवा गौरव पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून डॉ. यादव या वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. सध्या त्या तालुका वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा बजावत असून निराधार फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामाबाबत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

वरील संस्था दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, गोवा राज्यातील अनेक व्यक्ती, सरकारी अधिकारी यांचा हा पुरस्कार देऊन सन्मान करतात. डॉ. ज्योती यादव यांना बेळगाव येथे झालेल्या कार्यक्रमात कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय कायदा मंत्री वीरप्पा मोइली, माजी केंद्रीय मंत्री रत्नमाला सावनूर, माजी खासदार अमरसिंह पाटील, कोल्हापूरचे माजी महापौर राजू शिंगाडे, कर्नाटकचे जिल्हा पोलीस प्रमुख महेश मेघण्णावर, माजी जिल्हा कमांडर अरविंद घट्टी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी अमोल यादव उपस्थित होते.

भातशेतीत पाणी शिरून धान्याची नासाडी

चिपळूण (प्रतिनिधी) : तालुक्यातील कोंढेमाळवाडी येथे कापणी केलेले भातपीक शेतात पसरून ठेवलेले असतानाच अचानक कळवंडे धरणाचे पाणी कॅनलमार्फत चेंबरमधून बाहेर पडून शेतात घुसल्याने धान्याची प्रचंड नासाडी झाली. हातातोंडाशी आलेला घास असा हिरावल्याने बाधित शेतकरी हवालदिल झाले आहेत. गेले दोन दिवस हे पाणी सुरू असून हजारो लिटर पाणी वाया जात आहे. धरणात मुबलक पाणीसाठा नसताना ते पाणी कोणी सोडले.

नाशिक महानगरपालिका,नाशिक
सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग,
पाणी पुरवठा
ई-निविदा सुचना क्र. ०७ (सन २०२३ - २४)
नाशिक महानगरपालिका, नाशिक सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा विभागाच्या व्हॉलमनपदाची कामे आऊट सोर्सिंगच्या माध्यमातुन करणे या कामांची ई-निविदा सुचना क्र. ०७ (सन २०२३-२४) **दि.०६/११/२०२३ पासुन दि.०५/१२/२०२३ रोजी ३.०० वाजेपावेतो मा.शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल.**
टीप- यापुढील सर्व आवश्यक सुचना/शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.
स्वाक्षरीत
अधीक्षक अभियंता
सार्व आरोग्य अभियांत्रिकी विभाग पा.पु
नाशिक महानगरपालिका नाशिक
जनसंपर्क/जा.क्र/३२०
दि.२/११/२०२३
सर्व नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
जाहीर निवेदन
वाडा विभागातील सर्व औद्योगिक, वाणिज्यक तसेच घरगुती विद्युत ग्राहकांना सुचित करण्यात येत आहे की, महापारेषण (MSETCL) बोईसर विभागा अंतर्गत अति उच्च दाब (EHV) २२० केव्ही उपकेंद्र , वाडा येथे २२ के.व्ही. बस सेक्शन -३ व ५ खालिल फिडर चे रूटीन मेन्टेनन्स, बस जंपर बदली करणे व हॉट स्पॉट अटेंन्ड करण्याचे काम शुक्रवार दि. ०३.११.२०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी १३ : ०० वाजेपर्यंत ३ तास हाती घेणार आहेत. त्याकरिता खालिल फिडरवर लोडशेडिंग राहणार आहे. याची सर्व ग्राहकांनी नोंद घ्यावी.
१) २२ के.व्ही (तुसा) फिडर करिता ४.५२ मेगा वॅट
२) २२ के.व्ही (कोका कोला) फिडर करिता २.५३ मेगा वॅट
३) २२ के.व्ही (कळंभ) फिडर करिता १७.९७ मेगा वॅट
४) २२ के.व्ही (खनिवली) फिडर करिता १.०१ मेगा वॅट
५) २२ के.व्ही (वाडा) फिडर करिता २.५७ मेगा वॅट
६) २२ के.व्ही (औद्योगिक) फिडर करिता ३.०० मेगा वॅट
७) २२ के.व्ही (वरला) फिडर करिता ५.८३ मेगा वॅट
Sd/-
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, बोईसर
ता. पालघर, जि. पालघर-४०१५०१

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक
नोंदणीकृत कार्यालय : ग्रेप गार्डन क्रमांक २७, ३ रा ए क्रॉस, १८ मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगला, बेंगळुरू ५६० ०९५, कर्नाटक
विभागीय कार्यालय : ७ वा मजला, अलमॉण्ट आयटी पार्क, अनुक्रमांक ८, खराडी मुंढवा बायपास, मौजे खराडी, पुणे ४११ ०१४.
जाहीर लिलाव सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना.
उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदाच्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव 'जसा आहे तसाच आहे' आणि 'जसा आहे तसाच आहे' या दिवशी केला जाईल.

अ.क्र.	कर्जखाते क्रमांक / शाखा	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / तारणदार यांचे नाव	१३(२) सूचनेची तारीख / येणे असलेली रक्कम (रुपयांत) संबंधीत तारखेला	ताबा घेतल्याची तारीख	मालमत्तेची पाहणी करण्याची तारीख आणि वेळ	राखीव किंमत रुपयांत / ईएमडी रुपयांत	बोली आणि ईएमडी सादर करण्याची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1	4505210130000057 / 4505- विरार	१) मोहम्मद अमीन गाझी २) श्रीमती फातिमा फारुक गाझी दोघेही राहणारः सदनिका क्र. ६, ११८ काश्मिरी बिल्डींग, निशाणपाडा रोड, डोंगरी झम्माम हॉटेल जवळ, मुंबई महाराष्ट्र ४०০००९	११.१०.२०२१/ २७.०९.२०२१ अनुसार रु. १६,३३,०९७/-	१५/०४/२०२३	१० नोव्हेंबर २३ आणि १७ नोव्हेंबर २३ रोजी स. ११ वा. पासून सायं. ०५. वा. पर्यंत	रु. १२,७१,०००/- रु. १,२७,१००/-	२२ नोव्हेंबर २०२३ रोजी स. ११ वा ते सायं. ०५ वा.	२३.११.२०२३ आणि स. ११.०० वा. ते दु. २.०० वा.

स्थावर मालमत्तेचे वर्णनः मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल फ्लॅट क्र. ०९ असून, ५६५ चौ.फू. इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील बिल्ट-अप एरिया 'वीनेसा अपार्टमेंट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'डेल्वीनएपेक्स' या प्रकल्पाने भूखंड क्रमांक ४८ बांधला, सर्व्हे क्रमांक १५०, १५१, भूखंड क्रमांक ४८ जुना व्हॅली क्रमांक ३०५वर वसलेले. आणि सावरोली, (बुद्रुक) ता. शहापूर व जि. ठाणे
अर्नेस्ट मनी डिपॉझिट (इरठे) आयएनआरमध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे अदा केले जावे), बोली सादर करण्याचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. अग्रवाल लाइफस्टाइल अव्हेन्यू ग्लोबल सिटी विरार पश्चिम विरार, जि. - पालघर ४०१३०३. संपर्क व्यक्तीः नितीन गमरे-९७६८१९८२३४, शिवाजी खाडे-७०५८०८०९१५.
अटी आणि शर्ती : इ लिलाव 'जसे आहे जिथे आहे' आणि 'जे आहे, ते आहे' तत्वावर घेण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. इ लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त इ लिलाव सेवा पुरवठादार मेसर्स सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून संपर्क व्यक्ती : विनोद चौहान (मो क्र ९८१३८८७९३१) यांच्याकडून घेण्यात येणार आहे. इच्छूक बोलीदार याना सल्ला देण्यात येतो की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions येथे भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com येथे भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना इ लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा नर्णिय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. ही सूचना महत्वाच्या मुद्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदार यांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशा घटना टाळण्यासाठी बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे जे लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेऊ शकतील.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.
स्थळ : ठाणे
दिनांक : ०२.११.२०२३
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक